# 'परिवर्तनाचा वाटसरू'ला 'प्रबोधन पुरस्कार'

ठाण्यातील 'वी नीड यू' या संस्थेच्या वतीने नव्यानेच सुरु करण्यात आलेल्या 'प्रबोधन पुरस्कारा'साठी 'परिवर्तनाचा वाटसरू'ची निवड करण्यात आली. १९ मे २०१८ रोजी सायंकाळी ठाण्यातील टाऊन हॉलमध्ये हा पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम पार पडला. ख्यातनाम साप्ताहिक इपीडब्ल्यूचे संपादक आणि जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील राज्यशास्त्राचे प्राध्यापक डॉ. गोपाळ गुरु यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ संपादक आणि खासदार कुमार केतकर, मुक्त पत्रकार दीप्ती राऊत, 'वी नीड यू'चे जयंत कुलकर्णी आणि संजीव साने उपस्थित होते.

यावेळी वाटसरूला देण्यात आलेल्या मानचिन्हावरील मजकूर पुढीलप्रमाणे :

"महाराष्ट्राच्या वैचारिक जडणघडणीत केलेल्या योगदानाकरिता तसेच बहुजन समाजातील लेखकांना आपले प्रश्न व विचार मांडण्याचे माध्यम सातत्याने चालविणाऱ्या 'परिवर्तनाचा वाटसरू' या पाक्षिकास हा 'प्रबोधन पुरस्कार' देत आहोत. पुढील वाटचालीस शुभेच्छा!"

हा पुरस्कार वाटसरूच्या वतीने संपादक अभय कांता यांनी स्वीकारला. यावेळी वाटसरूचे संपादक डॉ. शरद नावरे आणि डॉ. प्रज्ञा दया पवार, कार्यकारी संपादक, प्रा. देवेंद्र इंगळे, तसेच संपादक मंडळातील डॉ नारायण भोसले आणि प्रा. वृषाली मगदूम उपस्थित होते.

वाटसरूच्या वतीने 'वी नीड यू'चे मनापासून आभार मानत आहोत.

पुरस्कार वितरण कार्यक्रमानंतर 'प्रसारमाध्यमे आणि लोकशाहीसमोरील आव्हाने' या महत्त्वपूर्ण विषयावर उपरोक्त मान्यवर वक्त्यांचा जाहीर परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास ठाण्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर आवर्जून उपस्थित होते.